**ठळक बातम्या**

- आगामी लोकसभा निवडणूक निःपक्षपाती आणि भयमुक्त वातावरणात व्हावी, असं काँग्रेसचं देशातल्या संवैधानिक संस्थांना आवाहन

- अमेरिकेच्या फेडरल रिझर्व बँकेच्या प्रमुख व्याजदरात सलग पाचव्यांदा बदल नाही

- जगभरात ई-कचऱ्याचं प्रमाण वाढत असल्याबद्दल, संयुक्त राष्ट्रांना चिंता

- स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची आगेकूच

**आणि**

- महाराष्ट्रात नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात अनेक ठिकाणी आज सकाळी भूकंपाचे धक्के

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणूक निःपक्षपाती आणि भयमुक्त वातावरणात व्हावी असं आवाहन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी देशातल्या संवैधानिक संस्थांना केलं आहे. नवी दिल्ली इथं आज ते पत्रकार परिषदेत बोलत होते. निवडणूक रोखे व्यवहाराबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर तपशील उघड झाला, त्यात ५३ कोटी रुपयांचा निधी भाजपाला मिळाला असल्याचं आढळलं असून काँग्रेसला ११ कोटी रुपये रोख्यांद्वारे मिळाले आहेत. भाजपाने अद्याप काहीही कर भरलेला नाही. याबाबत यंत्रणा गप्प आहेत असं ते म्हणाले. मात्र दुसरीकडे कांग्रेसची खाती गोठवली आहेत,विविध यंत्रणांकडून विनाकारण नोटिसा जारी केल्या जात आहेत.

एकूण काँग्रेसला निवडणूक लढवता येऊ नये याकरता विविध यंत्रणांचा वापर करुन त्रास दिला जात आहे असा आरोप त्यांनी केला. लोकशाहीचं रक्षण करण्याच्या दृष्टीनं निवडणूक समान पातळीवर लढण्याची संधी काँग्रेसला मिळावी असं आवाहन खरगे यांनी केलं. काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेता सोनिया गांधी आणि माजी अध्यक्ष राहुल गांधी या पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

**<><><><><>**

निवडणूक आयोगानं  केंद्र, सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना - रेल्वे तसंच विमानतळांसारख्या सरकारी मालमत्तांवर - सर्व अनधिकृत राजकीय भित्तिपत्रकं त्वरित हटवण्याच्या - सूचना दिल्या आहेत. देशभरात अशा अनेक ठिकाणी अनधिकृत राजकीय जाहिराती अजूनही प्रदर्शित केल्या जात असल्याच्या तक्रारी आपल्याकडे विविध स्तरातून येत असल्याचं निवडणूक आयोगानं राज्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या सर्व बँकांनी सरकारी कामकाजाकरता आपल्या  सर्व शाखा येत्या ३१ मार्च रोजी खुल्या ठेवाव्यात  असे निर्देश  भारतीय रिझर्व बँकेनं दिले आहेत.  चालू आर्थिक वर्षातच सरकारी व्यवहारांचा हिशेब पूर्ण करता यावा याकरता ३१ मार्च रोजी बँका सुरू ठेवण्याची विनंती सरकारने केली होती. त्या पार्श्वभूमीवर रिझर्व बँकेनं हे निर्देश दिले. तसंच या दिवशी सुरू राहणार असलेल्या बँकिंग सेवांबद्दल योग्य ती प्रसिद्धी द्यावी, असं  आरबीआयनं  बँकांना कळवलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व बँकेनं प्रमुख व्याजदर सलग पाचव्यांदा सव्वा-पाच ते साडे-पाच टक्के या टप्प्यात  कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. फेडरल

रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनी फेडरल ओपन मार्केट कमिटीच्या दोन दिवसीय बैठकीनंतर आज हा निर्णय जाहीर केला. मात्र महागाई कायम असूनही २०२४ या वर्षात तीनदा व्याजदर कपात अपेक्षित असल्याचे संकेत या बैठकीत देण्यात आले. फेडरल रिझर्व बँकेनं चालू आर्थिक वर्षात डिसेंबरमध्ये अमेरिकी अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर २ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असा अंदाज वर्तवला आहे. यापूर्वी तो १ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा अंदाज वर्तवण्यात आला होता.

**<><><><><><>**

जगभरात ई-कचऱ्याचं प्रमाण वाढत असून, इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या पुनर्वापरात घट होत असल्यानं तो आणखी वाढेल, अशी भीती संयुक्त राष्ट्रांच्या संस्थानी व्यक्त केली आहे. ई-कचरा म्हणजे प्लग किंवा बॅटरीसह टाकून दिलेली उपकरणं असून, यामध्ये मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक खेळणी, टीव्ही, मायक्रोवेव्ह ओव्हन, ई-सिगारेट, लॅपटॉप संगणक आणि सौर पॅनेल यांचा समावेश आहे. यामध्ये इलेक्ट्रॉनिक वाहनांपासून निर्माण झालेल्या कचऱ्याचा समावेश नाही, तो वेगळ्या श्रेणीत येत असल्याचं संस्थेनं म्हटलं आहे. २०२२ मध्ये जगभरात सुमारे ६२ दशलक्ष टन "ई-कचरा" निर्माण झाल्याचं संयुक्त राष्ट्रांची आंतरराष्ट्रीय दूरसंवाद संघटना आणि संशोधन शाखेनं जारी केलेल्या अहवालात म्हटलं आहे. हा कचरा भरलेले ट्रॅक्टर्स एका मागोमाग उभे केले, तर त्याची रांग संपूर्ण पृथ्वीला वेढा घालू शकेल, असं यात म्हटलं आहे. २०३० सालापर्यंत पृथ्वीवरच ई-कचरा ८२ दशलक्ष टन इतका होईल असा अंदाज यात वर्तवण्यात आला आहे. यापैकी निम्मा ई-कचरा आशियाई देशांमध्ये निर्माण झाला असून, इथल्या काही देशांमध्ये तो गोळा करण्याबाबतचे कायदे लागू आहेत. तसंच युरोपमध्ये पुनर्वापर आणि संकलन

दर सर्वाधिक म्हणजेच ४० टक्के असून, तिथे दरडोई कचरा निर्मिती सर्वाधिक म्हणजेच जवळजवळ १८ किलो इतकी असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

दिल्लीतल्या उच्च न्यायालयाच्या परिसरात दिव्यांग , जेष्ठ नागरिक, गरोदर स्त्रिया यासारख्या विशेष मदत आवश्यक असणाऱ्या लोकांना मार्गदर्शन करणारा मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या हस्ते आज या कक्षाचं उद्घाटन झालं. आजचा उपक्रम म्हणजे, न्यायमूर्ती रवीन्द्र भट्ट यांच्या अध्यक्षतेखालच्या समितीच्या अहवालानंतर सुरु करण्यात आलेल्या मोहिमेचं पुढचं पाऊल आहे, अशी माहिती सरन्यायाधीशांनी दिली. या समितीनं दिलेल्या सूचनांनुसार या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची आगेकूच सुरु असून किरण जॉर्ज ने आज झालेल्या सामन्यात जपानच्या टाकुमा ओबायशी याचा २१-१८,२१-१९ असा सरळसेटमध्ये पराभव करत उपउपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आहे. दूसऱ्या एका सामन्यात प्रियांशु राजावत यानेही हॉंगकॉंगच्या लि च्युक यीयु याचा २१-१२, २१-१५ असा पराभव करत उप उपांत्य फेरीत जागा मिळवली आहे. या आधी सतीश कुमार करुणाकरन आणि आद्या वरीयाथ यांनी मिश्र दुहेरीत मलेशियाच्या रॉय किंग याप आणि वलिरी सीओ या जोडीचा २१-१८,११-१२,२१-१९ असा पराभव करत उपउपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. कदंबी श्रीकांत आणि लक्ष्य सेन यां ंनीही आपले सामने जिंकून पुरुषांच्या उपउपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. श्रीकांतचा सामना उद्या मलेशियाच्या झी झीया ली

याच्याबरोबर होणार असून लक्ष्य सेनचा सामना तैवानच्या चिया हिसीन लि बरोबर होणार आहे.

**<><><><><><>**

मिआमी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताच्या रोहन बोपन्ना आणि त्याचा ऑस्ट्रेलियन साथीदार कॉम्पट्रियट मॅथ्यु हेडन यांचा पुरुष दुहेरीचा सामना उद्या इटलीच्या ॲन्ड्रिया वावासोरी आणि सिमोन बोलेली यांच्या बरोबर होणार आहे. बोपन्ना आणि त्याचा साथीदार सध्या दूहेरीत जगातील पहिल्या क्रमांकाच्या मानांकनावर आहेत. भारताचा दूसरा खेळाडू युकी भांब्री आणि त्याचा न्युझिलंडचा साथीदार मायकेल वेनस यांचा या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत पहिला सामना अमेरिकेच्या ऑस्टीन क्रॅजिकेक आणि क्रोशियाच्या इवान डोडींग यांच्या बरोबर उद्या होणार आहे.

**<><><><><><>**

आज जागतिक वन दिन. वनांचा मानवी जीवनाशी असणारा संबंध, वनांवर अवलंबून असणारी प्राचीन औषध प्रणाली तसंच जैवविधता याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. यानिमित्तानं, जगभरात जंगल निर्मिती, संगोपन आणि संरक्षणाचा संदेश देणारे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जागतिक वन दिनानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. पृथ्वीवरची सजीव सृष्टी आणि निसर्गाचं संतुलन अबाधित राखण्यासाठी वृक्षांचं संगोपन तसंच संरक्षण आवश्यक आहे, असं मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. जागतिक वन दिनानिमित्त वनांचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कटीबद्ध होऊया, असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्रात नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात अनेक ठिकाणी आज सकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. सकाळी सहा वाजून नऊ मिनिटाच्या सुमारास आधी साडेचार रिक्टर तीव्रतेचा एक धक्का बसला. नंतर लगेचच ३पूर्णांक ६ दशांश रिक्टर तीव्रतेचा दुसरा धक्का जाणवला. या भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यात आखाडा बाळापूर इथं १० मीटर खोल असून, हिंगोली, परभणी, नांदेड या तीनही जिल्ह्यातल्या गावांना भूकंपाचे धक्के जाणवले. मराठवाड्यात १९९३ च्या भूकंपानंतरचे हे सर्वांत जास्त तीव्रतेचे धक्के असल्याचं एमजीएमच्या खगोलशास्त्र अंतराळ तंत्रज्ञान केंद्राचे संचालक श्रीनिवास औंधकर यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा मुख्य परीक्षा- २०२२ या परीक्षेतून गट-अ आणि गट-ब पदाच्या अर्हताप्राप्त उमेदवारांच्या तात्पुरत्या निवड याद्या, आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या उमेदवारांना २७ मार्चपर्यंत भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय उपलब्ध आहे, अशी माहिती आयोगाच्या प्रसिद्धीपत्रकात देण्यात आली आहे. २७ मार्च नंतर ही शिफारस यादी, गुणवत्ता यादीसह आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, असं आयोगानं जाहीर केलं आहे.

**<><><><><><>**

होळीच्या सणादरम्यान प्रवाश्यांच्या सोयीसाठी रेल्वे विभाग ५४० विशेष रेल्वे गाड्या चालवणार आहे. या गाड्या देशातल्या मुख्य ठिकाणांदरम्यान धावणार आहेत, अशी माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली आहे. यामध्ये गोरखपूर - मुंबई याशिवाय दिल्लीपासून पाटणा , भागलपूर, मुझफ्फरपूर आणि कोलकाता ते पुरी

अशा गाडयांचा समावेश आहे. प्रवाश्यांच्या सुरक्षिततेसाठी मुख्य स्थानकांवर अतिरिक्त रेल्वे सुरक्षा दलं तैनात करण्यात आली आहेत.

<><><><><><>

निवडणूक आयोगाच्या दक्षता पथकानं काल मुंबईच्या घाटकोपरमधून ७२ लाख ९ हजार रुपयांंची रोख रक्कम जप्त केली आहे. या प्रकरणी दिलीप नाथानी आणि अतुल नाथानी यांना अटक करण्यात आली असून पंतनगर पोलिस या दोघांंची चौकशी करत आहेत.

<><><><><><>

ईशान्य भारत, आणि पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या डोंगराळ प्रदेशात येत्या २३ मार्च पर्यंत मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तसंच पश्चिम बंगालचा गंगेच्या खोऱ्यातला प्रदेश, बिहार आणि झारखंडमध्ये तुरळक ठिकाणी आज मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. आणि त्यानंतर पाऊस ओसरेल असा अंदाज आहे.

//<><><><><><>//